

# सुवास्तु

समृद्ध जीवनशैलीला... तथास्तु !

front

## डीएसके-यशश्री...

### आकांक्षांना साकारणारी निर्मिती...



काळाबरोबर बदलत जाणाऱ्या नाशिक शहरामध्ये निर्मितीच्या संकल्पनाही बदलत आहेत. मुंबई-नाशिक चौपदरी महामार्गाच्या निर्मितीनंतर मुंबई महानगराचाच 'एक विस्तारीत विकास परिसर' म्हणून नव्या युगाचं 'नवं नाशिक' उदयास येतय. ऑटोमोबाईल, उत्पादन, आय टी, आय टी ई एस, सेवा, कृषी इ. अनेक क्षेत्रात नाशिक 'डेव्हलपमेंट हब' म्हणून विस्तारतंय. नव्यायुगाच्या या नव्या नाशकात रोजगाराच्या संधीसाठी स्थलांतरीत होणारा वर्गही मोठ्या प्रमाणावर असणार आहे. त्यामुळे एकूणच गृह व व्यावसायिक प्रकल्पांची मोठ्या प्रमाणावर गरज भासणार आहे.

निर्मिती क्षेत्रांत अत्याधुनिक जीवनाच्या गरजा पूर्ण करणाऱ्या व पारंपरिक जीवनमूल्यांची जोड असणाऱ्या गृह व व्यावसायिक प्रकल्पांना उत्तम मागणी असणार आहे. या बदलत्या गरजांना जाणून नव्या युगाच्या आकांक्षांना साकारणारं नाव म्हणून 'यशश्री'नं आपली प्रतिमा निर्माण केलीय. ग्राहकांचा विश्वास, पारदर्शी व्यवहार व ग्राहकांच्या मनांत जे, तेच उत्तमतेसह साकारण्याची शैली यामुळे यशश्री आणि आकांक्षा साकारणारी निर्मिती हे समीकरण झालंय. मी स्वत: व्यवसायानं सिव्हील इंजिनिअर असल्याने, बांधकाम क्षेत्रातील नवनवीन प्रवाहांना सृजनशीलतेसह भारतीय पारंपारीक जीवनशैलीची जोड देण्याचा माझा प्रयत्न आहे. आधुनिक काळातील निर्मितीला उत्तमतेनी साकारणारा हा समूह 'डीएसके' सारख्या नामवंत बांधकाम संस्थेची दाद मिळवून गेलाय, आणि म्हणूनच 'डीएसके' यांनी 'यशश्रीची' निवड केली. उत्तमतेसाठी विविध ठिकाणी लौकिकास पात्र ठरलेल्या या दोन प्रवाहांचा सुरेल संगम गोदातीरी घडून येतोय.

या वास्तूना 'सुवास्तू'त रूपांतरीत करणाऱ्या प्रत्येकास या संगमातून आरोग्य, सुरक्षा व भरभराटीची समृद्ध जीवनशैली देण्याची खात्री देतो.

आपला

श्री विराज लोमटे

front back



Typical floor plan 1,3,5

discription



Typical floor plan 2,4,6

discription



Typical floor plan 1,3,5

discription



Typical floor plan 2,4,6

discription



सुवास्तु

समृद्ध जीवनशैलीला... तथास्तु !

## 'सुवास्तु' म्हणजेच परिपूर्ण जीवनशैलीला.. तथास्तु !

नाशिकच्या अंबड एमआयडीसी परिसरात, शांत व प्रदूषणमुक्त वातावरणात आम्ही साकारतोय 'सुवास्तु'. वास्तुशास्त्राची पारंपरिक मूल्यं व अत्याधुनिक जीवनातील गरजा यांचा सुरेल संगम साधणारी जीवनशैली. कुटुंबातील चिमुरड्यांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सगळ्यांच्या मनातलं घर साकारणारं संकुल. खऱ्या अर्थानं एका समृद्ध जीवनशैलीला 'तथास्तु' म्हटल्याचा विश्वास.




# सुवास्तूमधील सुविधा

- प्रशस्त फ्लॅट
- आरामदायी सुविधा
- 'कॉमन वॉल' नसलेले अपार्टमेंट
- वास्तुशास्त्रपारीत रचना
- जिमनॅशिअम
- चिल्ड्रन प्ले पार्क
- सर्व सोयींनीयुक्त गेस्ट हाऊस
- संस्कार मंदिर
- पार्कींग
- सर्व्हंट क्वार्टर
- ज्येष्ठ नागरिकांसाठी वाचन कक्ष
- सिक्युरीटी
- गेस्ट पार्किंग

second back



## भिंतींना कान नसणारं

## 'कौटुंबिक प्रायव्हसी' जपणारं घर !

इथे शेजार आहे, त्याचा भक्कम आधारही आहे पण त्याला तुमच्या कौटुंबिक विश्वात डोकवण्याची संधी मात्र मुळीच नाही.कॉमन वॉल नसलेले अपार्टमेंटस् हे सुवास्तूचं खास वैशिष्ट्यं. इथली घरं कौटुंबिक प्रायव्हसी जपतात त्यामुळे प्रत्येक फ्लोअरवर स्वतंत्र घर असल्याचं समाधान इथे मिळतं....

- प्रत्येक फ्लोअरवर गृहिणींना एकत्रीत येण्यासाठी मोकळी लॉंज
- स्वतंत्र भिंती असलेले फ्लॅटस्



## आरसा तुमच्या घराचा !

'अतिथ्य' हा घराचा अंगभूत संस्कार. तो असला की घराला घरपण येतं. मग घराविषयीचा जिव्हाळा आप्तस्वकियातही वाटला जातो. तुमच्या घराचा हॉल म्हणजेच घरी येणाऱ्या पाहुण्यांचं स्वागत करणारा तुमचा प्रतिनिधी. संपूर्ण घराच्या स्वभावाची जणू स्पष्ट ओळख देणारा आरसा. हा हॉल साकारताना आम्ही प्रत्येक बाबीसाठी भरपूर जागा दिली आहे. पारंपरिक बैठक किंवा अत्याधुनिक जीवनातली लिव्हींग रुम, तुम्ही काहीही नाव द्या, त्याला साजेसं सारं काही तुम्हाला इथं नक्कीच मिळेल.

• प्रशस्त हॉल • खेळती हवा • नैसर्गिक प्रकाश



## अन्नाला 'पूर्ण ब्रम्हत्व' येतं ते असं...

'अन्न' हा तर संस्कार तन, मन अन् जीवन यांचं पोषण करणारा. उत्तम पोषणासाठी अन्नातील सत्वं जेवढी महत्त्वाची तेवढीच महत्त्वाची अन्न शिजवतांना गृहिणीच्या चेहऱ्यावरची प्रसन्नता. सुवास्तूमधील परिपूर्ण स्वयंपाकघर गृहिणीच्या चेहऱ्यावर आनंद फुलवणारं. एका असीम समाधानासह संपूर्ण कुटुंबाला तृप्तीचा आनंद देणारं!

- हायजेनिक किचन
- वास्तुशास्त्राचा कल्पक वापर
- आधुनिक गृहिणीच्या संकल्पनेतलं स्वयंपाकघर
- डायनिंगसाठी भरपूर जागा



## सौख्याच्या उबेत हवाहवासा विसावा....

सुवास्तूमध्ये घरातील प्रत्येक बाबींचं नियोजन आज अन् उद्याच्या बदलत्या जीवनमानाचा अभ्यास करुन केलेलं आहे. त्याची प्रचिती इथे क्षणोक्षणी येते. बेडरुम अथवा 'शेजघर' हे त्याला अपवाद कसे असेल? दिवसभरातील धावपळीनंतर मन विसावतं ते इथेच. सौख्याच्या उबेत शांतपणे निद्रीस्त झाल्यावर उद्याच्या स्वप्नांतही मन रमून जातं ते इथंच. शेजघरात नियोजन केलंय ते मन:शांतीसह एका हव्या हव्याशा विश्रांतीचं. वास्तुशास्त्रानुसार केलेल्या रचनेमुळे वायव्येकडून येणारा सुखद वारा बेडरुमधलं वातावरण आल्हाददायी व प्रसन्न ठेवतो. इथल्या भिंतीचे रंग, कपबोर्ड, ड्रेसिंग टेबल, स्टडी टेबल यासाठी असणारी जागा, एका परिपूर्ण बेडरुमची संकल्पना साकारणारा.

**• प्रशस्त बेडरूम • बेडरूम साधनांसाठी भरपूर जागा • शांत व प्रसन्न अंतर्गत रचना**



## ‘अंगाईगीत’ गाणारा एक मायेचा ‘झोपाळा’

बालपण उमलतं, मोहरतं अन् बागडतं ते चार भिंतीत सामावलेल्या एका विस्तीर्ण विश्वात. हे विश्व एका चिमुकल्या जिवाला जिज्ञासेचे पंख देतं. आयुष्याचं आभाळ कवेत घेण्याचं सामर्थ्य देतं.तुमच्या चिमुकल्यांसाठी हे विश्व साकारताना आम्ही सगळ्याच बाबींचा बारकाईनं विचार केलाय. इथलं चिल्ड्रेन्स बेडरूम हे त्याचं एक आदर्श उदाहरण. अगदी धमाल मस्तीपासून ते शुभंकरोतीच्या प्रार्थनेपर्यंत व होमवर्क आणि अध्ययनापासून ते गुणगुणेपर्यंत सर्व बाबींची काळजी घेणारं व मायेच्या कुशीत चिमुकल्यांना वात्सल्यपूर्वक विसावा देणारं असंच हे ‘ चिल्ड्रेन्स बेडरूम’ आहे.

- **मुलांच्या गरजा जाणणारं चिल्ड्रेन्स बेडरूम**
- **अभ्यासाची सुरेख व्यवस्था**
- **सुरक्षेचा विश्वास देणारी रचना**




## वास्तूशास्त्राच्या मुल्यांनी संपन्न घर

योग्य लोकेशन, खेळती हवा, नैसर्गिक प्रकाश, पुरेशी जागा व परिपूर्ण जीवनाची संकल्पना साकारणाऱ्या सुविधा यांची सुरेल गुंफण म्हणजे वास्तुशास्त्रावर आधारीत गृहरचना. 'सुवास्तू' हे वास्तुशास्त्राधारीत रचनेचं उत्तम उदाहरण. पारंपरिक वास्तूशास्त्रातील शास्त्रीय संकल्पनांचा कल्पक वापर आम्ही इथे केलाय. त्रारीक सारीक बाबींतून एक परिपूर्ण व सुनियोजित जीवनाचं चित्र किती सुरेखपणे आखता येऊ शकतं? याची प्रचिती इथे येते.

वास्तुशास्त्रातील मूल्यं, सुवास्तूमध्ये एका संपन्न व परिपूर्ण जीवनशैलीचा विश्वास देतात हे नक्की.

- वास्तुशास्त्रावर आधारीत रचना
- परीपूर्ण जीवनशैली
- अत्याधुनिक व पारंपरिक जीवनाचा सुरेल संगम



## बदलत्या ऋतूत कवच सुरक्षेचे...

सुवास्तूमधील वास्तूरचना ही बदलत्या ऋतूतील तीव्र चढउतारांना भक्कमपणे सामोरी जाणारी आहे. ९.५ फुट मजबूत जाडीच्या भिंतीमुळे प्रखर ऊन, वारा, पाऊस, यापासून घराचं संरक्षण होईल. त्यामुळे ऋतूमान कसेही असू द्या, तुमचं घरटं सुरक्षेच्या उबेत असेल हा विश्वास इथे मिळतो.

- ९.५ फुट मजबूत जाडीच्या भिंतीमुळे ऋतूमानातील चढउतारात संरक्षण



## टुमदार घरट्यावरं पंख सुरक्षेचे...

आधुनिक जीवन हे अत्याधुनिक सुख सोयींमुळे सुखवस्तु झाले आहे हे खरे परंतु वाढत्या गुन्हेगारीमुळे ते तितकंच असुरक्षितही झाले आहे. 'सुवास्तु'मध्ये तुमचं घर साकारताना तुमचं कुटुंब चोविस तास सुरक्षा व संरक्षणाच्या ऊबेत राहावं याचा आम्ही बारकाईनं विचार केलाय. अत्याधुनिक सुरक्षा व्यवस्था व प्रशिक्षित सुरक्षा गार्डस् यांमुळे सुरक्षेची इथे मुळीच चिंता नाही.

- प्रशिक्षित सुरक्षा गार्डस्
- अत्याधुनिक सुरक्षा यंत्रणा



## आनंद सामाजिक सांस्कृतिक जीवनातला!

सुवास्तूमध्ये या, इथल्या प्रसन्न वातावरणात साकारलेल्या कम्युनिटी लॉनमध्ये सहज फेरफटका मारा. इथे घर घेतल्यानंतर तुमच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनाची जणू रुपरेषाच आम्ही साकारतोय याची खात्री तुम्हाला पटेल. छोटे मोठे कौटुंबिक कार्यक्रम, सोसायटीचे समारंभ, गेट टुगेदर्स यांच्यासाठी उत्तम व्यवस्था इथे आहे. आनंदाचे, उत्सवाचे क्षण हितचिंतक, मित्रांसह साजरे करण्याची प्रेरणा देणारं हे 'कम्युनिटी लॉन' आहे.

- छोट्या मोठ्या समारंभासाठी उत्तम व्यवस्था
- आकर्षक रचना
- विविध कार्यक्रमांसाठी वापर शक्य



## संस्कार बागडण्यातला...

खेळणं, बागडणं, स्वच्छंदी राहणं हेच बालपणाचं रम्य व गोंडस रुप. परंतु या बागडण्यातही संस्कार असावा... त्यातून एका परिपूर्ण व्यक्तीमत्त्वाच्या जडणघडणीची बीजं रोवली जावीत ही संकल्पना मनी बाळगून आम्ही साकारलांय इथला चिल्ड्रेन प्ले पार्क! इथले खेळ अन् खेळाची साधनं पारंपरिक व अत्याधुनिक संगोपनाचा सुवर्णमध्य साधणारी.

• खेळण्यास भरपूर जागा • अत्याधुनिक व पारंपरिक खेळांची साधने • पालकांसाठी आसन व्यवस्था



## समर्पणाचा संस्कार देणारं मंदिर....

जीवनातील यशापयशाला सृष्टीच्या कर्त्याच्या पायी समर्पित करावं, कर्तव्य अन् कर्तृत्वाच्या अर्चनेतून आयुष्याची आराधना करावी हा संस्कार शिकवणारं संस्कार मंदिर हे सुवास्तूमधील एक आगळं वेगळं वैशिष्ट्य. यशाची शिखरं पादाक्रांत करण्यासाठी सामर्थ्य देणारं सुवास्तूमधलं घर, विनम्र भावनेसह समर्पणाचा संस्कार अंगी रुजवतं, ते इथंच.

- शांत व प्रसन्न वातावरण
- आकर्षक रचना
- समर्पण हीच भक्ती शिकवणारं मंदिर
- शेजाऱ्यांना पारंपरिक बंधनात गुंफणारं मंदिर



## संस्कार..तन-मनाच्या सामर्थ्याचा!

घड्याळाच्या काट्याशी स्पर्धा करत अत्याधुनिक जीवनाचा वेग पेलताना, यशाची क्षितीजं गाठताना गरज असते ती तन अन् मनाच्या सुआरोग्याची. 'आरोग्य हीच संपदा' हा सुवास्तुचा आणखी एक संस्कार. म्हणूनच तुम्हाला मानसिक व शारीरिक आरोग्याने संपन्न जीवनशैलीची भेट देण्यासाठी आम्ही साकारलीय अत्याधुनिक व पारंपरिक साधनांनी संपूर्ण अशी व्यायामशाळा. अत्याधुनिक जीम इन्स्ट्रुमेंट्स, पारंपरिक व्यायाम साधनं हे इथलं वैशिष्ट्य.

- **शांत, प्रसन्न वातावरण**



## अतिथी देवो भवः

आजच्या धकाधकीच्या दिनक्रमात घरी आलेल्या पाहुण्यांचं आगत स्वागत करताना होणारी धावपळ व त्यासाठी कामातील वेळेची ओढाताण करताना होणारा मनस्ताप हा नित्याचाच. हीच बाब लक्षात घेऊन घरी येण्याऱ्या पाहुण्यांची उत्तम व्यवस्था व्हावी म्हणुन आम्ही वसुवास्तु' मध्ये साकारलंय एक सुविधा संपन्न गेस्ट हाऊस आता कितीही पाहुणे येऊदेत, तुम्ही अगदी घरी नसाल तरीही त्यांच्या उत्तम व्यवस्थेची काळजी घेण्यासाठी गेस्ट हाऊस असल्याने कसलीही चिंता नाही.

**• सर्व सोयींनी परिपूर्ण गेस्ट हाऊस • आरामदायी गेस्ट रुम • एकाचवेळी अनेक पाहुण्यांच्या निवासाची व्यवस्था**

## तपशील

- आरसीसी फ्रेम स्ट्रक्चर
- ९ इंच बीबीएम बाह्य व ४ इंच बीबीएम अंतर्गत भिंती
- सागवानी मुख्य दरवाजा मोल्डेड फ्लश डोअर व स्टील सेफ्टी डोअरसह
- मॉस्क्युटो नेट व एमएस डेकोरेटीव्ह ग्रीलसह अॅल्युमिनियम पावडर कोटेड खिडक्या
- हॉल व डायनिंगमध्ये डायमंड सिरॅमिक फ्लोरींग
- इतर खोल्यांमध्ये सिरॅमिक फ्लोरिंग
- किचन, बाथरूम व टॉयलेटसाठी ७ फुटापर्यंत डॅडो टाईल्स्
- स्टेनलेस स्टील सिंकसह ग्रॅनाईट ओटा
- हॉल व डायनिंग मध्ये व्हिट्रोफाईड सिरॅमिक फ्लोअरिंग
- अंतर्गत कन्सिल्ड प्लंबींग
- हॉलमध्ये कन्सिल्ड इलेक्ट्रीफिकेशन
- इतर रूममध्ये ओपन केसींग कॅपिंग
- बाहेरील बाजूस अॅक्रेलिकसिमेंट रंग व आतील बाजूस तुमच्या पसंतीच्या रंगाचा ऑईल बॉंड
- सर्व बाजूंनी मार्बल फ्रेम असलेल्या खिडक्या
- जनरेटर बॅकअपसह लिफ्टस्

## इतर सुविधा

- पाईपलाईनद्वारे एलपीजी गॅस
- कॉमन डिश अॅंटेना
- गार्डन व सार्वजनिक ठिकाणी सोलर बॅकअप
- प्रत्येक घरात सोलर वॉटर हिटर
- सुरक्षा गार्ड व सुरक्षा व्यवस्था
- इंटरकॉम सिस्टीम
- गॅस गिझरची व्यवस्था
- ८ फुट उंच सार्वजनिक संरक्षक भिंत




back inner page

Shree Yashashree Constructions Pvt. Ltd.


नाशिक ऑफिस – १३, श्रद्धा संकुल, जुना गंगापूर नाका, गंगापूर रोड, नाशिक–०५. फोन :०२५३ २३१०८४८, टेलीफॅक्स् :२५७१९९९
ई–मेल : yashashreegroup@yahoo.co.in
पुणे ऑफिस – श्री यशश्री, C/o डी. एस. कुलकर्णी डेव्हलपर्स लि., डीएसके हाऊस, जंगली महाराज रोड, शिवाजीनगर, पुणे.
मुंबई ऑफिस – श्री यशश्री, C/o डी. एस. कुलकर्णी डेव्हलपर्स लि., १४ उपासना, सेना भवनजवळ, एल.जे.मार्ग, शिवाजी पार्क, मुंबई.


back page